नवोपक्रम सन २०२२-२३

# “ हसत खेळत अंकज्ञान ”

स्पर्धेचा गट

पूर्व प्राथमिक गट

(गट क्रमांक – १)

अंगणवाडी सेविकेचे नाव

यास्मिन आलम खान

जिजामाता अंगणवाडी,

कोहोकवस्ती दौलावडगाव

एकात्मिक बाल विकास सेवा

योजना प्रकल्प आष्टी

तालुका – आष्टी

जिल्हा - बीड

# स्पर्धेकाची माहिती



| | | |
|---|---|---|
| स्पर्धकाचे पूर्ण नाव | : | यास्मिन आलम खान |
| भ्रमणध्वनी | : | 9373700940 |
| जन्म दिनांक | : | 17-05-1990 |
| कायमचा पत्ता | : | मु.पो. दौलावडगाव<br>ताः आष्टी जि. बीड |
| शैक्षणिक अर्हता | : | B.A., D.T. Ed |
| Email ID | : | yasminsayyad1412@gmail.com |
| एकूण सेवा | : | १ वर्षे ५ महिने |
| नवोपक्रम विषय | : | गणित |
| नवोपक्रम शीर्षक | : | " हसत खेळत अंकज्ञान" |

**प्रतिज्ञापत्र**

मी श्री/श्रीम/डॉ. यास्मिन आलम खान .......... प्रतिज्ञापत्र लिहून देतो/ देते की, या नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला हसत - खेळत अंकज्ञान .......... हा नवोपक्रम माझ्या स्वत:च्या शैक्षणिक उपक्रमांवर, अनुभवावर आधारित आहे. हा नवोपक्रम मला स्वत:ला सुचलेला आहे, काल्पनिक नाही. तसेच भारतीय अथवा विदेशी लेखकांच्या ग्रंथातील अथवा संशोधनातील माहितीच्या आधारे हा नवोपक्रम लिहिलेला नसून यामध्ये मला जाणवलेल्या समस्येचा सूक्ष्म अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. हा नवोपक्रम यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही. तसेच इतर कोणत्याही व्यक्तीकडून लिहून घेऊन तो मी माझ्या नावावर सादर केलेला नाही. तसे आढळून आल्यास तो Copyright Act १९५७ खाली दाखलपात्र गुन्हा आहे याची मला कल्पना आहे.

दिनांक : 25/11/2023

स्थळ : दौलावडगाव

बालविकास प्रकल्प अधिकारी
एकात्मिक बालविकास सेवा योजना, आष्टी

स्पर्धकाची स्वाक्षरी

नाव : यास्मिन आलम खान

शाळेचा /कार्यालयाचा शिक्का.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीम/डॉ. यास्मिन आलम खान .......... हे माझ्या शाळेत / कार्यालयात कार्यरत असून त्यांनी सादर केलेला हसत - खेळत अंकज्ञान .......... हा नवोपक्रम शैक्षणिक वर्ष 2022-23 मध्ये त्यांनी स्वत: राबविलेला असून ती त्यांच्या स्व-परिश्रमाची फलश्रुती आहे. हा नवोपक्रम त्यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत आयोजित यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक : 25/11/2023

स्थळ : दौलावडगाव

शाळा/ कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी

नाव : श्रीमती अंजली वाघमोरे

शिक्का: बालविकास प्रकल्प अधिकारी
एकात्मिक बालविकास सेवा योजना, आष्टी

# “ हसत खेळत अंकज्ञान ”

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | नवोपक्रमाच्या पायऱ्या | पान नंबर |
|---|---|---|
| १ | नवोपक्रम शीर्षक | ०१ |
| २ | प्रस्तावना | ०२ |
| ३ | नवोपक्रम गरज व महत्त्व | ०३ |
| ४ | नवोपक्रमाची उद्दिष्टे | ०४ |
| ५ | नवोपक्रमाचे नियोजन | ०५ |
| ६ | नवोक्रमाचे फोटो व अभिप्राय | ०८ |
| ७ | नवोपक्रमाची कार्यपध्दती | १२ |
| ८ | नवोपक्रमाची  यशस्वीता व फलनिष्पती | १७ |
| ९ | समारोप | १८ |
| १० | संद्रभसुची व परिशिष्टे | १९ |

# “ हसत खेळत अंकज्ञान




जिजामाता अंगणवाडी,

कोहोकवस्ती दौलावडगाव, ता. आष्टी, जि.बीड.

# प्रस्तावना

एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प आष्टी अंतर्गत येणाऱ्या दौलावडगाव सर्कल मधील अंगणवाडी केंद्र कोहोकवस्ती (दौलावडगाव) येथे मी जुलै २०२२ पासून मिनी अंगणवाडी सेविका म्हणून कार्यरत आहे. अत्यंत दुर्गम, डोंगराळ व अविकसित अशा वस्तीवर कार्यरत झाल्यापासून मी विद्यार्थ्यां- च्या गुणवत्तेपासून राहणीमानापर्यंत अनेक समस्यांचा व अडचणींचा अभ्यास केला. तेव्हा माझ्या असे लक्षात आले की, या भागातील बालकांचा गुणवत्ता विकास करताना मला नुसते रटाळवाणे पूर्व प्राथमिक शिक्षण देऊन जमणार नाही, तर या मुलांच्या बुध्यांकानुसार, वयानुसार व सभोवतालच्या परिस्थितीनुसार यांना विकसित भागातील मुलांच्या तुलनेत उभे करावे लागणार आहे. तसेच मला अंगणवाडी साठी वर्गखोली उपलब्ध नसल्याने मुलांचे लक्ष केंद्रित करायला मला खूप अडचणी येत होत्या. त्याचप्रमाणे अतिशय ग्रामीण भाग असल्यामुळे विद्यार्थ्यांकडे पुरेसे शैक्षणिक साहित्यही उपलब्ध नव्हते अशा परिस्थितीमध्येही मुलांचा गुणवत्ता विकास करण्यासाठी विविध प्रकारचे खेळ खेळून त्यांना शिकवण्याचा प्रयत्न केला.

या सर्व गोष्टींचा विचार करून मी अंगणवाडी केंद्र कोहोकवस्ती (दौलावडगाव) येथे सहज सोपे व कृतियुक्त शिक्षणावर आधारित अंकज्ञानाची गुणवत्ता पातळी वाढवणारा " हसत-खेळत अंकज्ञान" हा नावीन्यपूर्ण नवोपक्रम हाती घेतला.

# नवोपक्रमाची गरज व महत्त्व

अंगणवाडी केंद्र कोहोकवस्ती (दौलावडगाव) येथे रुजू झाल्यावर अंगणवाडीतील लाभार्थ्यांची परिस्थिती पाहिल्यावर खूप वाईट वाटले. लाभार्थ्यांची बौध्दिक, मानसिक व शारीरिक तंदूरुस्त असूनही त्यांची गुणवत्ता माझ्या बुद्धीला न पटणारी होती. त्यातूच अंकज्ञान अत्यंत अल्प प्रमाणात अवगत होते.

अंकज्ञान वाढवायचे असेल आणि विदयार्थ्यांची गुणवत्ता वाढवायची असेल तर झटून काम करावे लागेल हे निश्चित होते. बहुतेक मुलांना गणित म्हटलं की कंटाळवाणा व निरस विषय वाटतो. याचे खरे कारण म्हणजे मुलांना अंकज्ञानाचे असलेले अज्ञान होय. अवघड म्हणून गणित विषयाला पुरेसा वेळ न देणे हे होय.

अंगणवाड़ी स्तरावरच मुलांचे अंकज्ञान पक्के केले तर मुलांच्या मनामध्ये गणिताचे आकर्षण वाढवता येईल. कारण मुलांच्या बुद्धिचा ९०% विकास हा ५ वर्षापर्यंत झालेला असतो आणि या वयात ग्रहणक्षमता अधिक असते.

म्हणून्य अंकज्ञानाची गोडी मुलांच्या मनामध्ये निर्माण करता यावी, गणितीय विकास व्हावा, हसत्-खेळत अंकाचे आकलन व्हावे, या उद्देशाने मी "हसत-खेळत अंकज्ञान" हा नवोपक्रम अंगणवाडीमध्ये राबविण्याचा निश्चय केला. हा नवोपक्रम राबवून लाभार्थ्यांची मैत्री अंकज्ञानाशी घट्ट होणार याचा नवोपक्रम कर्त्यास पूर्ण विश्वास आहे.

# ✍ नवोपक्रमाची माझी उदिदष्टे ✍

1) अंगणवाडीचे वातावरण आनंदमय, चैतन्यमय व भीतीमुक्त करणे.

2) विद्यार्थी हसत-खेळत अंक शिकणार व गणितीय क्रिया करणार.

3) विदयार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविणे.

4) विदयार्थ्यांमध्ये अंकज्ञानाची (गणिताची) गोडी निर्माण करणे.

5) विद्यार्थ्यांना कृतियुक्त अध्ययनाचा आनंद मिळवून देणे.

6) विदयार्थ्यांची गुणवत्ता व ज्ञानलालसा वाढविणे.

7) अंगणावाडी सेविका व लाभार्थी यांच्यातील सुसंवाद वाढविणे.

# नवोपक्रमाचे नियोजन

## उपक्रमपूर्व स्थितीचे नियोजन

विद्यार्थ्यांना अंकाचे आकलन करताना अनेक अडचणी येत होत्या. विद्यार्थी अंगणवाडीत स्वतंत्ररित्या अंकाचे वाचन न करता फक्त माझ्या पाठोपाठ अंकाचे वाचन करीत होते. फक्त पाठांतरावर भर होता.

मंदिर परिसरात इतर आवाजामुळे व नैसर्गिक समस्यामुळे मुलांचे लक्ष केंद्रित करण्यात अडचण निर्माण होत होती.

## संबंधित व्यक्तींशी तज्ज्ञांशी चर्चा

मुलांच्या अंकज्ञानाशी निगडित समस्या दूर करून "हसत-खेळत अंकज्ञान" या नवोपक्रमासाठी आमच्या पर्यवेक्षिका, श्रीमती. अंजली वाघमारे मॅडम यांचे मार्गदर्शन घेतले.

## आवश्यक साधनांचा विचार

- पोषण आहारातील चना, गहू, वाटाणा यांचा वापर केला.
- THR ची पा कीटे
- निसर्गातील उपल्बध साहित्य उदा. पाने, फुले, दगड, काड्या, इ.
- पूर्व प्राथमिक संचाचा वापर केला.
- मुलांजवळ असणारे साहित्य, पेन्सिल, खडू, पेन, रुमाल, खोडरबर इत्यादींचा वापर केला.
- शेंगाची टरफले, खजुरांच्या बिया,

## करावयाच्या कृतींचा क्रम

- समस्या निश्चित केली.
- समस्येवरील उपाययोजनांची यादी केली.
- उपाययोजनेप्रमाणेने कृती केली
- मैदानात खेळ खेळायला दिले!.

- स्वत: च्या वस्तू मोजणे, घरून खडे मोजून आणणे अशा विविध कृती घेण्यात आल्या.
- मुलांबरोबर छोटे-छोटे खेळ खेळून एकाग्रता वाढवण्यात आली.
- खेळताना टाळ्या वाजवून मुलांना प्रोत्साहन देण्यात आले.
- आपण आज काय शिकलो, खेळलो यांबददल पालकांना सांगून खेळाचे व कृतींचे दृढीकरण करण्यात आले.

## उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण

- वेगवेगळे खेळ घेवून अंकाचे ज्ञान कायम- स्वरूपी टिकण्यास मदत झाली.
- अंकाची ओळख पटली.
- अंकज्ञानाचे दृढीकरण करता येऊ लागले.
- गणितीय क्रिया सहज व सोप्या वाटू लागल्या.
- गणिताबद्दल आकर्षण वाटू लागले
- अंकज्ञानाची आवड निर्माण झाली.
- अंगणवाडीतील उपस्थितीचे प्रमाण वाढले
- पालकांमध्ये अंगणवाडीबद्दल सकारात्मक दृष्टिकोन वाढला.
- शिकण्याची क्रिया गमतीदार वाटू लागल्यामुळे शिकण्याची ओढ निर्माण झाली.

## कार्यवाहीचे टप्पे (वेळापत्रक)

| वार | वेळ | खेळ |
|---|---|---|
| सोमवार | 1 तास | अवयवावर आधारित खेळ |
| मंगळवार | 1 तास | पोषण आहारावर आधारित खेळ |
| बुधवार | 1 तास | घरातील साहित्यावर आधारित खेळ |
| गुरुवार | 1 तास | पूर्व प्राथमिक संचावर आधारित खेळ |
| शुक्रवार | 1 तास | निसर्गातील साहित्यावर आधारित खेळ |
| शनिवार | 1 तास | मुक्त खेळ |

वर नमूद केलेले वेळापत्रक हे सन २०२२-२३ वर्षात राबवण्यात आलेल्या खेळांचे आहे. वेळापत्रकाप्रमाणे दररोज अंगणवाड़ी- मध्ये खेळ घेऊन अंकज्ञानाची आवड निर्माण करण्यात आली.

## उपक्रमासाठी इतरांची मदत

- हा नवोपक्रम करताना मला आमच्या आदरणीय पर्यवेक्षिका श्रीमती- अंजली वाघमारे मॅडम यांचे सहकार्य लाभले.
- हा नवोपक्रम लिहताना मला श्री. बी. यू. निंबाळकर सर बी. एस. शिंदे सर, एफ.एम. बागवान सर विषय साधून व्यक्ती गटसंसाधन केंद्र आष्टी यांचे सहकार्य लाभले.
- हा नवोपक्रम करताना किशोरवयीन मुलींचे सहकार्य लाभले.
- हा नवोपक्रम घेत असताना माता पालकांचेही विशेष सहकार्य लाभले.
- हा नवोपक्रम घेताना माझ्या मुलाचे व पतीचे सहकार्य लाभले.

# उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे















youtube channel Name

Creative अंगणवाडी

https://youtube.com/@creative9316?si=rgoAubm-we2HqDFR

# पालकांचा अभिप्राय

पालकांचा अभिप्राय

नमस्कार,

मी शोभा भरत कोहोक, माझी साडेतीन वर्षांची मुलगी आहे. मॅडम सुरुवातीला शाळेत येऊ लागल्या. त्यावेळेस माझी मुलगी स्वरा शाळेत जात नसायची. नेऊन सोडलं तरी शाळेत गेल्याबरोबरच रडायला सुरुवात करायची. आणि मी जोपर्यंत तिला मी घरी आणत नाही तोपर्यंत रडतच बसायची. परंतु मॅडम म्हणायच्या दररोज घेऊन येत जा तिला हळूहळू सवय लागेल. थोड्या दिवसांनी ती दुसऱ्या मुलांबरोबर थोडा वेळ बसून खेळू लागली. त्यांच्याबरोबर अभ्यास करू लागली.

मॅडम अभ्यासाबरोबरच वेगवेगळे खेळ घेतात. ती हळूहळू त्यांच्याबरोबर खेळूही लागली. मॅडम खेळता खेळता त्यांचा अभ्यास पण करून घेतात. आता माझ्या मुलीला शाळेत शिकवलेला सर्व अभ्यास येतो. मॅडम खेळता-खेळता अंक म्हणून घ्यायच्या. त्यांना कार्डवर अंक लिहून द्यायच्या. आता माझ्या मुलीला पन्नास पर्यंत मराठीत वाचता येते व 50 पर्यंत इंग्रजीत वाचता व लिहता येते. आता ती शाळेत जाताना रडत नाहि तर हसता हसता अंगणवाडीत जाते. स्वरा आता खूप हुशार झाली आहे.

आपली विश्वासू
शोभा भरत कोहोक

# पालकांच्या अभिप्राय

मी सचिन गणपत कोहोक. माझी मुलगी मॅडमच्या अंगणवाडीत जाते तेव्हापासून खूप हुशार झाली आहे. मॅडम सतत काहीतरी नवीन नवीन कार्यक्रम घेत असतात. त्यामुळे आमची मुले शाळेच्या कधीही कंटाळा करत नाही. सुट्टीच्या दिवशीही शाळेत जायच्या आग्रह करतात. माझी २ वर्षांची लहान मुलगीही अतिशय चांगल्या प्रकारे 1 पासून 10 पर्यंत न चुकता, हाताची घडी घालून म्हणते. मला व माझ्या घरच्यांना मुलींची प्रगती पाहून खूप चांगले वाटते. माझ्या मोठ्या मुलीला 1 पासून 100 पर्यंत अंकाचे न चुकता वाचन करता येते. त्याचप्रमाणे २ च्या पाढाही म्हणते आता तिचे वय 4 वर्षे आहे. मॅडम खेळता खेळता त्यांच्या अभ्यास करून घेतात त्यामुळे मुलांना अंगणवाडी खूप आवडते. मॅडमने जे काही शिकवले ते घरी सांगण्यास सांगतात. आमची सोनाक्षी आजीला आजोबाला, तिच्या आईला, आणि मला हाताला धरून बसवते आणि मॅडमने शिकवलेले सगळे काही सांगते. आता तर सुट्टी असेल तरीही आमच्या मुली आम्हाला शाळेत जायचं आहे असं म्हणतात. मॅडमला फोन करून शाळेत यायच्या आग्रह करतात.

सचिन गणपत कोहोक

Kohok. S. G

# नवोपक्रमाची कार्यपध्दती.

## पूर्वस्थितीची निरीक्षणे व त्यांच्या नोंदी

- नवोपक्रम राबविण्यापूर्वी अंगणवाडीतील उपस्थिती व गुणवत्ता हलाखीची होती.
- अंगणवाडी परिसरातील समाजाचा दृष्टिकोन अत्यंत नकारात्मक व कठोर होता.
- अंगणवाडीचा शैक्षणिक दर्जा अत्यंत खालावलेला होता.
- अंकज्ञानाबद्दल नावड निर्माण झाली होती.

## कार्यवाही दरम्यान केलेली निरीक्षणे व माहिती संकलन

शैक्षणिक वर्ष 2022-23 या वर्षी माझ्या अंगणवाडी केंद्रामध्ये ११ विद्यार्थ्यांचा पट आहे. या नवोपक्रमास ११ विद्यार्थ्यांची प्रायोगिक तत्वावर निवड करण्यात आली.

हा नवोपक्रम ३ वर्षे ते ६ वर्षे या वयोगटासाठी राबवायचा असल्याने मूलभूत अंकाची ओळख हा मुख्य उद्देश ठेवून गणितीय क्रियांचे दृढीकरण होणे अपेक्षित आहे.

"हसत-खेळत अंकज्ञान" हा नवोपक्रम घेण्याचे ठरले आणि मी विदयार्थ्यांसाठी आवश्यक अशा घट अभ्यास करून वेगवेगळे कृतीयुक्त खेळ तयार केले

- दगडांची आगगाडी
- पानांचा गोल
- टाळ्यांचा खेळ
- अंकाची टोपली
- संख्याचे गाणे

- शेंगदाणा खा
- पक्षी बसला झाडावर
- बोटे मोजा फुटाणे खा.
- रुमाल उचला
- आवाजाचा खेळ,

याप्रमाणे अनेक खेळातून अंकज्ञान होईल अशा नावीन्यपूर्ण पध्दतीने कृतीयुक्त खेळांचे या नवोपक्रमात नियोजन करण्यात आले

या नवोपक्रमामुळे विदयार्थ्यांना उत्तम रित्या अंकज्ञान् होईल असा नवोपक्रम कर्त्याला विश्वास आहे.


## उपक्रम पूर्ण झाल्यावर केलेली निरीक्षणे व त्यांच्या नोंदी


- विद्यार्थी दररोज नवनवीन खेळ शिकू लागले.
- मुले घरीही टीव्ही, मोबाईल इ. व्यसन सोडून मी शिकवलेले खेळ खेळू लागली.
- घरी खेळताना मुले पालकांनाही सोबत घेऊन खेळत असल्यामुळे विद्यार्थी-पालक आंतरक्रिया वाढली.
- मी शिकवलेले खेळ सर्वांनी सोबत खेळायचे असल्यामुळे सामाजिक विकास घाडू लागला.
- खेळाद्वारे मुलांचे लक्ष केंद्रित करण्यास मदत झाली.
- अंगणवाडीतील उपस्थिती वाढली
- पालकांच्या मनात अंगणवाडीबद्दल असलेला नकारात्मक दृष्टीकोन दूर होऊन आत्मीयता निर्माण झाली.


## कार्यवाही करताना आलेल्या अडचणी

- मुलांना अंगणवाडीत बसण्याचे वळण नसल्यामुळे खेळताना अस्ताव्यस्त होत असत.
- आत्मविश्वासाची कमतरता असल्यामुळे खेळण्यास नकार दयायची.
- खेळाबद्दल घरी पालकांना माहिती देण्यास् मुलांना सांगितले तर मुले विसरून जात होती.
- ऊन, वारा, पाऊस यासारख्या नैसर्गिक अडचणीही निर्माण झाल्या.
- नुकतेच ३ वर्षे पूर्ण झालेल्या मुलांना मैदानी खेळ खेळण्यात अडचण यायची.

# माहितीचे विश्लेषण




आकलनाची टक्केवारी
१०
२०
३०
४०
५०
६०
७०
८०
९०
१००
डिसेंबर
जानेवारी
फेब्रुवारी
मार्च
एप्रील
मे
जून
जुलै
ऑगस्ट
सप्टेंबर

# ✍ नवोपक्रमाची यशस्विता (फलनिष्पत्ती) ✍

- खेळामधून अंकाची ओळख होत असल्यामुळे मुले आनंदाने शिकू लागली.
- खेळामुळे अंगणवाडीचे वातावरण उत्साही झाले.
- खेळ आणि अभ्यास एकत्रित पणे होत असल्याने मुले सकारात्मक बनली.
- खेळ संपल्यावर दिलेल्या प्रोत्साहनामुळे मुलांमध्ये आत्मविश्वास वाढला.
- या नवोपक्रमाचा उपयोग पालकांना घरीही करण्यास सांगितल्यामुळे पालक व लाभार्थी यांच्यातील संवाद वाढून मुलांमधील चिडचिडेपणा, रागीटपणा व हट्टीपणा कमी होण्यास मदत झाली.
- विद्यार्थ्यांमध्ये अंकज्ञानाची (गणिताची) गोडी निर्माण झाली.
- या नवोपक्रमाचा फायदा अंगणवाडी सेविका, पालक व विद्यार्थी यांना झाला.
-

# समारोप

सन २०२२-२३ मध्ये माझ्या अंगणवाडीतील मुलांना अंकज्ञानाचे कायमस्वरूपी व टिकाऊ असे आकलन घडवून आणण्यासाठी पर्यायी मार्ग शोधून " हसत-खेळत अंकज्ञान" हा नवोपक्रम पूर्ण होण्यास मदत झाली.

विद्यार्थ्यांच्या अंकज्ञानावरील समस्येवर आधारित उपाय करण्यासाठी हा मी केलेला अत्यंत प्रामाणिक प्रयत्न आहे.

वरील समस्या शोधून त्याचे निराकरण करताना समाजाच्या व पालकांच्या सहकार्याचा आधार घेत " हसत-खेळत अंकज्ञान हा नवोपक्रम राबवला. मुलांना गुणवत्तापूर्ण आणि सर्जनशील बनवण्यासाठी योग्य त्या सुधारणा करत मी या प्रयोगाद्वारे जी यशस्वीता प्राप्त केली आहे, त्याने मला अंगणवाडी सेविका असल्याचा अभिमान वाटू लागला आहे.

" हसत-खेळत अंकज्ञान" या, नवोपक्रमाची ही कार्यपद्धती सर्वांपर्यंत पोहचावी

हा माझ्या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे.

# ✍ संदर्भसूची व परिशिष्टे ✍


- creative investigation in early math.
- you tube channel
- इयत्ता १ लीचे गणित पाठ्य पुस्तक